महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
**जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, हिंगोली.**

**Email ID-** diethingoli@maa.ac.in जुनी जि.प. इमारत शिवाजी नगर ४३१५१३ **दु. क्र.** ०७२५२-२३४

जा.क्र.जिशिवप्रसंहिं/ शिक्षक स्पर्धा /२०२५-२०२६/ दिनांक-३०/१०/२०२५

**सुधारित पत्र**

प्रति,

१. मा. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (सर्व)
२. मा. जिल्हा क्रीडा अधिकारी (सर्व)
३. शिक्षणाधिकारी प्राथमिक, जि प (सर्व)
४. शिक्षणाधिकारी माध्यमिक, जि प (सर्व)
५. तालुका क्रीडा अधिकारी (सर्व)
६. गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती (सर्व)
७. प्रशासनाधिकारी, मनपा नपा, सर्व

**विषयः शिक्षक व अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करणेबाबत.**

संदर्भः १. राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२०,
२. राज्य अभ्यासक्रम आराखडा २०२४.
३. शासननिर्णय क्र. संकीर्ण २०२४/प्र.क्र.१०/एसडी-६ मंत्रालय, मुंबई दि. १५ मार्च २०२४ (SQAAF)
४. मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचेकडील जा.क्र. राशैसंवप्रप/शिक्षक स्पर्धा/२०२५-२६, दिनांक १०/१०/२०२५ चे पत्र
५. मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचे दिनांक १४/१०/२०२५ रोजीच्या Online बैठकीमधील सूचना.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, राज्यातील राज्य मंडळाच्या अधिनस्त असणाऱ्या सर्व शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, अनुदानित, अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षीय यंत्रणेतील अधिकारी, कर्मचारी यांच्यामध्ये शैक्षणिक, प्रशासकीय कौशल्य वृद्धिंगत करणे, त्यांच्यात समन्वय, सहकार्य व स्पर्धात्मकलेची भावना निर्माण करणे तसेच त्यांच्या डिजिटल, भाषिक व सादरीकरण कौशल्यांना चालना देण्याच्या उद्देशाने तालुका, जिल्हा व राज्य स्तरावर विविध स्पर्धाचे आयोजन शैक्षणिक वर्ष २०२५-

२६ पासून करण्यात येत आहे. या स्पर्धेच्या आयोजनासाठी निकष आणि नियमावली तयार करण्यात आली आहे. सदर स्पर्धा या एकूण ४३ विषयांवर आधारित असणार आहेत. नमूद स्पर्धेचे निकष व नियमावली याबाबतची सविस्तर माहिती शिक्षक व अधिकारी/ कर्मचारी स्पर्धा मार्गदर्शिका या पुस्तिकेत देण्यात आलेली आहे. शिक्षक अधिकारी व कर्मचारी यांनी सदर पुस्तिकेत देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करावे, सदर पुस्तिका ही राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे या संस्थेच्या www.maa.ac.in या संकेतस्थळावर उपयुक्त या टॅबवर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे

वरील नियोजनानुसार सन २०२५-२६ वर्षापासून एकूण ४३ स्पर्धांचे आयोजन राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे यांच्या निर्देशानुसार राज्यातील सर्व DIET कडून आयोजित करण्यात येणार आहे. याबाबत संबंधित DIET कडून मार्गदर्शक सूचना पत्र दिले जाणार आहे. त्यानुसार तालुकास्तरावर स्पर्धाचे आयोजन करावयाचे आहे.

वरील ४३ स्पर्धापैकी रांगोळी व लोकनृत्य स्पर्धेचे राज्यस्तरीय आयोजनाची जबाबदारी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, हिंगोली यांचेकडे देण्यात आलेली आहे. त्यानुसार या स्पर्धा आयोजनाबाबतच्या सूचना खालील प्रमाणे आहेत.

**स्पर्धा आयोजनाबाबत सूचना-**

संदर्भ क्र.५ च्या पत्रानुसार नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी म्हणजेच 7 नोव्हेंबर रोजी प्रत्येक तालुकास्तरावर स्पर्धा घेण्याचे नियोजित आहे त्यासाठी खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. स्पर्धेसाठी नाव नोंदणीसाठी जिल्हा /राज्य यांचेकडून केंद्रप्रमुख यांना लिंक देण्यात येईल.

२. केंद्रप्रमुख यांनी प्रत्येक स्पर्धेसाठी केंद्रातून एका शिक्षकाचे नाव स्पर्धेसाठी लिंकवर नोंदवावे

३. प्रत्येक स्पर्धेत केंद्रातील किमान एका शिक्षकाने सहभाग घेणेबाबत प्रोत्साहित करण्यात यावे.

४. स्पर्धानिहाय सहभागी होणाऱ्या कर्मचाऱ्यांची / शिक्षकांची लेखी संमती घ्यावी व स्पर्धेवेळी आयोजकांकडे सादर करावी.

५. सर्व स्पर्धासाठी तालुकास्तरावर सहभाग घेणाऱ्या शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांचे नामनिर्देशन गुगल फॉर्मद्वारे संकलित केले जाईल.

६. केवळ केंद्रप्रमुख यांना लिंक पाठविली जाईल व केंद्रप्रमुख यांनी स्वतः शिक्षकांची क्षमता, कौशल्य पाहून नामनिर्देशन करावे.

७. दि. ३१ऑक्टोबर २०२५ पर्यंत केंद्रप्रमुख यांनी शिक्षकांची माहिती भरण्याची प्रक्रिया पूर्ण करावी.

८. वैयक्तिक तालुकास्तरावरील प्रत्येक स्पर्धेचा विजेता विभाग स्तरावरील स्पर्धेसाठी पात्र राहील.

९. लोकनृत्य विभागीय स्पर्धेसाठी प्रत्येक जिल्ह्यातून एक स्पर्धक निवडला जाईल.

१०. या स्पर्धेची तयारी करण्यासाठी कोणत्याही प्रकारची सुट्टी घेता येणार नाही तसेच शिक्षकांच्या सहभागामुळे अध्ययन अध्यापनाचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी

११. तालुकास्तरावर वरील स्पर्धाची जबाबदारी ही गटशिक्षणाधिकारी यांची राहील गटशिक्षणाधिकारी यांनी तालुका क्रीडा अधिकारी व तालुकास्तरीय समितीच्या मदतीने तालुकास्तरीय स्पर्धा विहित वेळेत पार पाडाव्यात.

१२. तालुकास्तरीय स्पर्धेसाठी सक्षम परीक्षकांची नावे अंतिम करून DIET कडे बायोडाटासह दि ३१/१०/२०२५ पर्यंत पाठवावी तसेच स्पर्धेचे ठिकाण ही कळवावे.

१३. प्रत्येक स्पर्धेसाठी तीन परीक्षकांची निवड करण्यात यावी. परीक्षकांसाठी एससीईआरटी, पुणे कडून निधी प्राप्त झाल्यास स्पर्धेच्या दिवसासाठी निर्धारित मानधन देण्यात येईल.

१४. क्रीडा स्पर्धेचे ठिकान हे आवश्यक सुविधा उपलब्ध असलेले असावे.

१५. वैयक्तिक स्पर्धा या तालुकास्तर, विभाग स्तर व राज्यस्तर याप्रमाणे होतील.

१६ . लोकनृत्य स्पर्धा या तालुकास्तर, विभाग स्तर व राज्यस्तर याप्रमाणे होतील

**स्पर्धा प्रकार-**

| अ.क्र. | वार व दिनांक | स्पर्धेचे नाव | आयोजक जिल्हा | नोव्हेंबर तालुकास्तर | डिसेंबर विभागस्तर | जानेवारी राज्यस्तर |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | तिसरा शनिवार | लोकनृत्य स्पर्धा (वैयक्तिक) | हिंगोली | नोव्हेंबर अखेर पर्यंत कॉलम २ मधील दिवसापर्यंत पूर्ण करावयाचे कामकाज (प्रत्येक स्पर्धेतील १ विजेता निवडणे) | डिसेंबर अखेर पर्यंत कॉलम २ मधील दिवसापर्यंत पूर्ण करावयाचे कामकाज (प्रत्यक स्पर्धेतील ५ विजेता निवडणे) | पुर्ण करावयाचे कामकाज (प्रत्येक स्पर्धेतील १० विजेता निवडणे) |

**लोकनृत्य स्पर्धा आयोजनाबाबत सूचना-**

लोकनृत्य स्पर्धा: सामूहिक व सांस्कृतिक कौशल्यांच्या विकसनासाठी सदर स्पर्धा ओयजित केली जाईल. स्पर्धेबाबत सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे.

**गुणदान तक्ता निकष**

| अ.क्र. | निकष | गुण |
|---|---|---|
| 1. | पदन्यास मुद्राभिनय | २० |
| 2. | ताल | १० |
| 3. | गती | १० |
| 4. | सादरीकरण | २० |
| 5. | लोकनृत्य असणाऱ्या प्रांत/जमात अनुरूप वेशभूषा | २० |
| 6. | प्रश्नोत्तरे | ५ |
| 7. | प्रेक्षकांचा प्रतिसाद | ५ |
| 8. | पारंपरिकता | १० |
| 9. | एकूण | १०० |

**नियम व अटी :**

१ ) सदरील लोकनृत्य स्पर्धा ही वैयक्तिक स्वरूपाची असेल.

२) स्पर्धकांनी वेळेत सहभागाची नोंदणी करणे आवश्यक आहे.

३ ) नोंदणी न करणाऱ्या स्पर्धकांना ऐन वेळी प्रवेश दिला जाणार नाही.

४ ) सादरीकरणासाठी वेळ किमान ६ मिनिटे व कमाल ८ मिनिटे असेल.

५ ) सादरीकरण होत असलेल्या नृत्यात अश्लील व आक्षेपार्ह हावभाव नसावेत. असे आढळल्यास स्पर्धकास बाद केले जाईल.

६ ) ज्या गीतावर लोकनृत्य सादर होणार आहे ते गीत स्पर्धकाने स्वतः पेनड्राईव्हमध्ये आणावे.

७ ) लोकनृत्य सादरीकरणातून कोणतीही व्यक्ती / जमाती/समाज यांच्या भावना दुखावल्या जाणार नाहीत याची काळजी घ्यावी व विहित संकेत पाळावेत.

८ ) परीक्षकांचा निर्णय अंतिम असेल.

९ ) सहभागी स्पर्धकांना कोणत्याही प्रकारचा प्रवास व दैनिक भत्ता देय असणार नाही.

**पारितोषिकासाठीचा खर्च :**

केंद्र स्तर, तालुका स्तर, जिल्हा स्तर व राज्य स्तर रांगोळी स्पर्धेसाठी पारितोषिकाची रक्कम माननीय संचालक महोदय यांच्या आदेशान्वये जाहीर करण्यात येईल.

**तालुकास्तर क्रीडा स्पर्धा व अन्य स्पर्धा आयोजन समिती :-**

| अ.क्र. | सदस्याचे नाव | समितीतील पद |
|---|---|---|
| 1. | गटशिक्षणाधिकारी | अध्यक्ष |
| 2. | तालुका क्रीडा अधिकारी | उपाध्यक्ष |
| 3. | तालुका संपर्क अधिकारी (DIET) | सदस्य |
| 4. | तालुका आरोग्य अधिकारी | सदस्य |
| 5. | तालुका माहिती अधिकारी | सदस्य |
| 6. | स्थानिक पोलीस स्टेशन प्रतिनिधी | सदस्य |
| 7. | केंद्रप्रमुख प्रतिनिधी | सदस्य |
| 8. | विषय साधन व्यक्ती प्रतिनिधी | सदस्य |
| 9. | तालुका विस्तार अधिकारी (शिक्षण) | सदस्य सचिव |

**विभाग स्तरीय व राज्यस्तरीय स्पर्धा आयोजनासाठी जिल्हास्तर समिती-**

| अ.क्र. | सदस्याचे नाव | समितीतील पद |
|---|---|---|
| 1. | प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था | अध्यक्ष |
| 2. | जिल्हा क्रीडा अधिकारी | सहअध्यक्ष |
| 3. | शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि. प. | सदस्य |
| 4. | शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि. प. | सदस्य |
| 5. | जिल्हा आरोग्य अधिकारी प्रतिनिधी | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| 6. | जिल्हा माहिती अधिकारी प्रतिनिधी | सदस्य |
| 7. | स्थानिक पोलीस स्टेशन प्रतिनिधी | सदस्य |
| 8. | गटशिक्षणाधिकारी प्रतिनिधी | सदस्य |
| 9. | प्रशासनाधिकारी प्रतिनिधी | सदस्य |
| 10. | वरिष्ठ अधिव्याख्याता/ अधिव्याख्याता, DIET | सदस्य |
| 11. | वरिष्ठ अधिव्याख्याता/ अधिव्याख्याता, DIET | सदस्य सचिव |

वरील समितीच्या बैठकीचे आयोजन करून स्पर्धेविषयी माहिती द्यावी व तालुकास्तरीय स्पर्धा गटशिक्षणाधिकारी यांनी, विभाग स्तर व राज्यस्तर स्पर्धांचे आयोजन संबंधित जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांनी SCERT कडील नियोजनानुसार करण्यात यावे, याबाबत आवश्यकतेनुसार वरिष्ठ कार्यालयाचे मार्गदर्शन घेण्यात यावे.

**राज्यस्तरीय स्पर्धा मूल्यांकन/आयोजन समिती (आयोजक जिल्हा हिंगोली)**

| अ.क्र. | सदस्याचे नाव | समितीतील पद |
|---|---|---|
| 1. | प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था हिंगोली | अध्यक्ष |
| 2. | शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि. प. | सदस्य |
| 3. | शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि. प. | सदस्य |
| 4. | गटशिक्षणाधिकारी हिंगोली | सदस्य |
| 5. | तंत्रस्नेही शिक्षक-१ | सदस्य |
| 6. | तंत्रस्नेही शिक्षक-२ | सदस्य |
| 7. | वरिष्ठ अधिव्याख्याता, DIET हिंगोली | सदस्य सचिव |

वरील प्रमाणे समितीचे गठन करून बैठकीत स्पर्धेविषयी माहिती द्यावी. तालुकास्तरीय स्पर्धा गटशिक्षणाधिकारी यांनी तर विभागस्तर व राज्यस्तर स्पर्धांचे आयोजन संबंधित जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांनी SCERT, पुणे यांच्या मार्फत देण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचानाप्रमाणे करावे, आवश्यकतेनुसार वरिष्ठ कार्यालयाचे मार्गदर्शन घेण्यात यावे.

सोबत :-

१. मा. संचालक, SCERT, पुणे यांचे संदर्भिय पत्र

२. मार्गदर्शक पुस्तिका व नियमावली

Signed by Bhanudas
Bhagvanta Putwad
Date: 02-11-2025 10:25:41

( भानुदास पुटवाड)
प्राचार्य
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, हिंगोली

प्रतिलिपी :

१. मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर

२. मा. शिक्षण उपसंचालक, सर्व विभाग महाराष्ट्र राज्य यांना माहितीस्तव सविनय सदर